जळगाव
देशदूत

सोमवार,
दि. १६ डिसेंबर २०१३

# रेटिना इंडिया व एम्को फाउंडेशनच्या शिबिरात ६०० जणांची नेत्रतपासणी




शिबीराचे उद्घाटन करतांना महापौर राखीताई सोनवणे, सौ.रत्नाभाभी जैन, डॉ.एस.एन.लाळीकर, डॉ.रजत अग्रवाल, रमेशदादा जैन, नितीन लढ्ढा, मिनाक्षी जैन, अशोक जैन आदी

जळगाव, दि.१५ (प्रतिनिधी)

रेटिना इंडीया व एम्को फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात प्रथमच आयोजीत डोळ्यांच्या पडद्याच्या तपासणी शिबीरात जिल्ह्यातील ६०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. खान्देश सेंट्रल मॉल येथे सकाळी ९ ते ४ वाजेदरम्यान आयोजीत या शिबीरात आवश्यकता असलेल्या रुग्णांना लेसरथेरपीची सुविधा देण्यात आली.

या शिबीराप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.एस.एन.लाळीकर, डॉ.रजत अग्रवाल, डॉ.शिवाजीराव मुळीक, खान्देश विकास आघाडीचे अध्यक्ष रमेशदादा जैन, सौ. रत्नाभाभी जैन, महापौर राखीताई सोनवणे, उपमहापौर सुनिल महाजन, स्थायी समिती सभापती नितीन लढ्ढा, मिनाक्षी जैन, जैन उद्योग समुहाचे उपाध्यक्ष अशोक जैन, एसडी-सिडचे चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. या डोळ्यांच्या पडद्याच्या तपासणी शिबीरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बायोनिक आयचे संशोधक अमेरिका येथील रहिवासी व संकरा नेत्रालय चेन्नई येथील पुर्वसल्लागार डॉ.रजत अग्रवाल यांनी आलेल्या रुग्णांची तपासणी केली. तसेच रेटीना इंडिया या संस्थेच्या कार्याविषयी व डोळ्यांच्या पडद्याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

शिबीराच्या यशस्वीतेसाठी एम्को फाउंडेशन व महाराणा प्रताप विद्यालयाचे शिक्षकवृंद, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. रामेश्वर नाईक, अरविंद देशमुख, अमित देशमुख, पितांबर भावसार यांचे सहकार्य लाभले. तसेच सिव्हील सर्जन डॉ.लाळीकर यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हाभरातील सरकारी दवाखान्यातील नेत्ररोगतज्ञांनी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

शिबीरातील मोतीबिंदू असलेल्या गरजू नेत्ररुग्णांचे विनामुल्य ऑपरेशन मुंबई येथे निष्णात नेत्ररोगतज्ञ करतील. या रुग्णांची मुंबई येथे जाण्यायेण्याची व्यवस्था विनामुल्य करण्याचे रेटिना इंडिया व एम्को फाउंडेशनच्या विश्वस्त मिनाक्षी जैन यांनी सांगितले. या नेत्रतपासणी शिबीरात जिल्ह्यातील ६०० नागरिकांची तपासणी करण्यात आली.